बुधवार, दि २९ जानेवारी २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक १७ वा ● किंमत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com

युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

## निवडणुका व ओबीसी आरक्षण याचिकेची सुनावणी २५ फेब्रुवारीला

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका लांबणीवर!

**नवी दिल्ली -** गेल्या ३-४ वर्षांपासून लांबणीवर पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसदर्भात आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होते. सर्वाच्च न्यायालयात मंगळवार (दि. २८) रोजी २३ व्या नंबरवर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका व ओबीसी आरक्षण यांच्यातील याचिकेवर अंतिम सुनावणी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत होती. मात्र, पुन्हा एका तारीख पे तारीख पाहायला मिळाली आहे. राज्य सरकारच्यावतीने तुषार मेहता यांनी बाजू मांडली. त्यानंतर, सर्वोच्च न्यायालयाने याप्रकरणी नवी तारीख दिली असून पुढील सुनावणी २५ फेब्रुवारी रोजी होणार आहे. त्यामुळे, आणखी जवळपास एक महिन्यानंतर ही सुनावणी होणार असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्याचं दिसून येत आहे. दरम्यान, दुसरीकडे राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली असून शिवसेनेकडून मुंबई महापालिका निवडणुका स्वबळावर लढण्याची घोषणा देखील केली आहे. मात्र, अजून काही काळ सर्वांनाच वाट पाहावी लागेल.

कोर्टाने कुठेही निवडणुकांना स्थगिती दिली नाही. पण, ओबीसी आरक्षणाचा मुद्दा रखडल्याने राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयाकडे याबाबत निर्णय घेण्याची विनंती केली होती. त्यातच, आज न्यायालयात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासंदर्भात काही जणांना न्यायालयात धाव घेतली आहे. ओबीसी आरक्षण असो की नसो पण निवडणुका व्हाव्यात अशी मागणी या याचिकाकर्त्यांनी आहे. दरम्यान, राज्यात महायुतीचं सरकार आल्यानंतर, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच व्हाव्यात यासाठी आम्ही प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले होते. राज्य सरकार म्हणून न्यायालयात बाजू मांडताना सर्वोच्च न्यायालयाकडून लवकरात लवकर अंतिम सुनावणी करावी अशी विनंती असल्याचेही फडणवीस यांनी म्हटले होते. आता, याप्रकरणी आज झालेल्या सुनावणीत न्यायालयाने २५ फेब्रुवारी ही नवी तारीख दिली असून पुढील सुनावणी तेव्हाच होणार आहे. त्यामुळे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणखी काही काळ पुढे ढकलण्यात आल्याचं दिसून येत आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांचे भविष्य असणार आहे. यावर्षी निकाल लागण्यासाठी सरकार शर्थीचे प्रयत्न करणार आहे. राज्यातील २९ महागनरपालिका, २५७ नगरपालिका, २६ जिल्हा परिषद आणि २८९ पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. त्यामुळे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे सर्वपक्षीय कार्यकर्त्यांचे लक्ष आहे. तसेच, राजकीय पक्षांनीही मोर्चेबांधणी सुरू केली असून पक्षाचे मेळावे व बैठकांच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना बळ दिलं जात आहे.

युवा आदर्श

### पुकारा ...

असते कुणी संकटात
मदतीला करे पुकारा
आशा असे पल्लवीत
कुणीतरं ऐके हाकारा
काय करायचे मजला
नाठाळ देतात नकारा
बहिरे होतात कानसेन
कशाला द्यावा हुंकारा
कुणीतरी करेलं मदत
आव्हान देई अहंकारा
आम्ही भलतेचं बिझी
जागृत होई फणकारा
पीडीत क्षीणस्वरातला
करत राहतो ललकारा
देवदूत वाटे धावणारा
क्वचित येतो सहकारा
वेळ येऊ शके तुझेवर
कधीअसे विचार करा
धाऊन येती मदतीला
मारतीलंहजारो चकरा
तुमच्या रूपांत देवदूत
नकळत देणारं देकारा
पुण्यकर्म घडे अनायचे
द्या अंतर्मनाला पुकारा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा

## मनोज जरांगे यांचे उपोषण सोडविण्यासाठी खा काळे यांचे अजित पवारांना निवेदन



**जालना । प्रतिनिधी -** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषणाला बसले असून नुकतीच खा. काळे यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली होती. त्यानंतर तातडीने खा. डॉ कल्याण काळे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भेटून जरांगे पाटील यांच्या प्रकृतीविषयी चिंता व्यक्त करत त्यांना उपोषण सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत निवेदन दिले. यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन उपोषण सोडविण्याचा प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन खा. डॉ. काळे यांना दिले आहे.

खा. डॉ. काळे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज दादा जरांगे पाटील हे

१०४ मराठा बांधवांसमवेत मराठा समाजाला आरक्षण व त्या अनुषगांने मागण्यांची पुर्तता होण्यासाठी मौजे अंतरवाला सराटी, ता.अंबड, जि.जालना येथे शनिवार, (दि २५) पासुन आमरण उपोषणाला बसलेले आहेत. मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावलेली आहे. मराठा समाजाच्या भावना तीव्र असुन असंतोष निर्माण झालेला आहे.

मनोज दादा जरांगे पाटील व १०४ मराठा बांधव यांच्या खालावत चाललेल्या प्रकृतीची दखल घेऊन हे उपोषण तातडीने सोडविण्यासाठी आवश्यक ती कारवाई करण्यांत यावी.

## अपंगांना देण्यात येणाऱ्या कर्जावरील जाचक आटी शिथिल करा

### शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील समाजकल्याण अंतर्गत महाराष्ट्र राज्य वित्त अपंग महामंडळ अंतर्गत अपंगांना ५ लाख रुपयाचे कर्ज मंजुरी मिळल्यानंतर लाभार्थ्यांना दोन साक्षीदार देणे गरजेचे आहे. हि अट शिथिल करण्याच्या मागणीचे निवेदन आज दि.२८ मंगळवार रोजी दुपारी साडे बारा वा. च्या सुमारास देण्यात आले.दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की, अंपंग हा अपंगच असतो शासनाने त्यांना योजना भरपुर दिल्या पण सवलत दिल्या नाहीत.

अपंग लाभार्थी हा व्यावसाय करु शकतो आणि करुण दाखवू शकतो पण पाचलाख रुपये अनुदानात तो आपला स्वताच्या पायावर उभा राहू शकतो. पण शासनाने त्यांना दोन साक्षीदार, दोन शासकीय कर्मचारी किंवा दोन सातबारा धारक देणे गरजेचे असल्याची अट घातलेली आहे. अपंगांना कोणीही साक्षीदार म्हणून राहत नाही कारण मुळात हे अपंग असतात. त्यामुळे हि अट आपल्या परीने तात्काळ रद्द करण्यात यावी. व अपंग लाभार्थ्याना तात्काळ पाच लाखाचे धनादेश वाटप करून त्यांना व्यावसयासाठी मदत करावी अशा आशयाचे निवेदन देण्यात आले. दिलेल्या निवेदनावर शिवसेना ऊबाठा शहर प्रमुख संजय रत्नपारखे, माजी नगरसेवक तथा गटनेते जगन्नाथ चव्हाण, नारायण पवार, शिवाजी झोल ई. च्या स्वाक्षऱ्या आहेत.



## रहिवासी प्रमाणपत्र, बोगस अर्ज वाटपाची चौकशी होऊन फॉरेन्सिक ऑडिट झाले पाहिजे - किरीट सोमय्या

**जालना । प्रतिनिधी** - महाराष्ट्रात बांगलादेशी रोहिंग्यांना भारतीय बनवण्याचा षडयंत्र देवेंद्र फडणवीसांनी उघडकीस आणला असल्याचं भाजपा नेते माजी खासदार किरीट सोमय्या म्हणालेत. मागील ६ महिन्यात २ लाख १४ हजार बांगलादेशी रोहिंग्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्रात झाल्याबाबत अर्ज देऊन बोगस कागदपत्र दिले असा दावा सोमय्या यांनी केलाय. २ लाख १४ हजार अर्जांपैकी १ लाख १३ हजार लोकांना जन्म प्रमाणपत्र मिळालं असल्याचं सोमय्या यांनी म्हटलंय. सर्वाधिक रोहिंगे वास्तव्यास असलेल्या महाराष्ट्रातल्या टॉप १० ठिकाणांमध्ये जालन्यातील भोकरदनचा समावेश असून भोकरदन मध्ये २ हजार ५९४ जन्म प्रमाणपत्राचे अर्ज आले. त्यापैकी १२ अर्ज सोडून बाकी अर्जांना मंजूर देण्यात आल्याची माहिती सोमय्या यांनी दिलीय.



बोगस जन्म प्रमाणपत्र वाटपाची चौकशी होऊन फॉरेन्सिक ऑडिट झालं पाहिजे अशी मागणी ही सोमय्या यांनी केलीय. ज्या बांगलादेशी नागरिकांना खोटे प्रमाणपत्र दिले गेले त्यांच्याविरोधात फौजदारी कारवाई केली जाईल असा इशारा देखील सोमय्या यांनी आज दिनांक २८ मंगलवार रोजी बारा वाजेच्या सुमारास जालना जिल्हाधिकारी कार्यालयात दिलाय. ज्यांनी बोगस जन्म प्रमाणपत्र दिले अशा अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाणार असल्याचं सोमय्या यांनी स्पष्ट केलंय. दरम्यान, जालना जिल्ह्यात ११ हजार ४९१ बोगस पद्धतीने जन्म प्रमाणपत्र वाटप करण्यात आल्याचं सोमय्या म्हणालेत.

# संपादकीय

## वृत्तपत्रांच्या मागण्यांकडे कायम दुर्लक्षच..

गेल्या अनेक वर्षांचा इतिहास राहिला आहे. वृत्तपत्रे आणि पत्रकारांच्या मागण्यांकडे शासनाने कायमच दुर्लक्ष केले आहे. फार ओरड झाल्यानंतर काही प्रमाणात पत्रकार तसेच वृत्तपत्रांना काही देऊन खुश करण्याचा प्रयत्न नेहेमीच झालेला दिसून आलेला आहे. त्यातल्या त्यात काही विशिष्ट वृत्तपत्रांच्या समुहांना फायदा होईल हाच दृष्टिकोन ठेवून अनेकदा शासनाने कायदे केलेल आहेत. २०१८ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने देखील शासकीय संदेश प्रसार नियमावली २०१८ नुसार मोठ्या वृत्तपत्रांना अधिकचा फायद्या देण्याच्या दृष्टिकोनातून नियमावली ठरवली होती. मात्र, छोटी वृत्तपत्रे या नियमावलीने संपतील अशी धारणा झाली आणि या नियमावलीनंतर सुधारीत नियमावली जाहीर करून काही अंशी छोटी वृत्तपत्रे जगतील असे भासविण्यात आले. मुळात लघु संवर्गातील दैनिके त्याही पेक्षा साप्ताहिकांना या नियमावलीत वाटाण्याच्या अक्षता दाखविण्यात आल्या. या नियमावलीत पुन्हा एकदा सुधारणा करण्याच्या गरजेचे आहे. नुकतेच प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्ह्ययाच्यावतीने उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जालन्याच्या पालकमंत्री तथा पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, आ. बबनराव लोणीकर, आ. अर्जुनराव खोतकर यांना निवेदन देण्यात आलेले आहे. यात प्रामुख्याने शासकीय संदेश प्रसार नियमावलीतील मुद्द्यांकडे लक्ष वेधले असून दर दोन वर्षांनी महागाई निर्देशांकाची सांगड घालून दरवाढ करणे अपेक्षित असतांना गेल्या सहा वर्षांमध्ये सरकारने एकदाही दरवाढ केलेली नाही त्यामुळे ही दरवाढ द्यावी. गेल्या अडीच वर्षांपासून वृत्तपत्रांची पडताळणी रखडलेली आहे ती पडताळणी करण्यात यावी, सहाय्यक संचालक व उपसंचालक यांच्या एमपीएससीच्या माध्यमातून २०२२ मध्येख जाहीरातीकाढून भरती प्रक्रिया राबविण्यात आली होती. पुढे ती ही थंडावली. ही भरती प्रक्रिया राबविण्यात यावी. शासनाकडून विविध जाहीराती ह्या प्रसिद्धीसाठी देण्यात येतात. यात प्रामुख्याने लघु संवर्गातील साप्ताहिकांना हमखास वगळल्या जाते. त्यांच्याकडे कायम दुर्लक्ष होत आहे. ग्रामीण भागातील पत्रकारांना अधिस्विकृती पत्रिकेचा लाभ मिळत नाही. त्यासाठी अशा पत्रकारांसाठी पुर्णवेळ पत्रकारितेची अट शिथील करण्यात यावी. विविध निविदा प्रक्रियेची जाहीरात केवळ संकेतस्थळावर पहावे या पद्धतीने देण्यात येते. या ऐवजी पूर्ण निवीदा जाहिरात प्रसिद्धीसाठी द्यावी. स्थानिक स्वराज्य संस्था देखील शासकीय जाहिरात यादीत सामाविष्ट असलेल्या साप्ताहिकांना जाहीरात देण्यास टाळाटाळ करते अशा वेळी शासनाने गांभीर्याने विचार करून त्यासाठी नविन नियमावली तयार करावी. अशा गंभीर मुद्द्यासह दर्शनी जाहिरातीत वाढ, आकारात वाढ, ज्येष्ठ पत्रकारांच्या पेन्शन प्रक्रियेतील किचकटता दूर करणे, वेब, युट्युब, पोर्टल अशा सोशल माध्यमांना जाहीरात देण्याबाबत धोरण निश्चित करावे, असे विविध मुद्द्यांवर सरकारने निर्णय घेणे आवश्यक आहे. सरकारने लक्ष दिले नाही तर राज्यभरातून याचे पडसाद उमटायला सुरुवात होऊ शकते.

# परीक्षा म्हणजे अंतिम लक्ष नाही - डॉ. शिल्पा केंद्रे



**जालना । प्रतिनिधी -** परीक्षेला जाता जाता या कार्यक्रमात डॉ. शिल्पा केंद्रे यांनी परीक्षा ही केवळ एक जीवनातला टप्पा असून अंतिम लक्ष नाही अशा अनेक परीक्षा ला सामोरे आयुष्यामध्ये जावे लागते त्यासाठी निर्भीडपणे आपण उभे राहिले पाहिजे या कार्यक्रमाचे आयोजन सावित्री फुले महिला एकात्म समाज मंडळ जालना यांच्या वतीने छत्रपती शिवाजी विद्यालय रेवगाव येथे दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या डॉ. शिल्पा केंद्रे यांनी परीक्षेचा कोणताही मनामध्ये तणाव न घेता केवळ अभ्यास करत राहणे जसे श्रीकृष्ण म्हणतात कर्मण्येवाधिकारस्तेमा फलेषु कदाचन कर्म करत जा आणि यश नक्की मिळेल याच पद्धतीने आपण अभ्यास करताना वेगवेगळ्या क्षेत्रातील यशस्वी व्यक्तीचे जीवन आपल्या डोळ्यासमोर ठेवले तर आपले ध्येय गाठता येईल कोणतेही संकट आले तरी जीवनात थांबले नाही पाहिजे कारण थांबणारा माणूस कधीच जिंकत नसतो त्यामुळे आपले ध्येय जिंकण्याचे आहे त्यामुळे आपले लक्ष आपण सतत डोळ्यासमोर ठेवून अभ्यास केला पाहिजे.

आपला नित्य नियमित अभ्यास व योग्य पद्धतीने प्राणायाम योगा याचा सराव व योग्य संतुलित आहार आपण परीक्षेच्या कालखंडात ठेवला पाहिजे त्यामुळे परीक्षा हे अंतिम लक्ष नाही तर आपल यश हे अंतिम लक्ष आहे आणि त्यामुळे आपल्या ध्येया पासून अजिबात विचलित होऊ नये असे मार्गदर्शन करण्यात आले तसेच त्यांनी शाळेतून मराठी विषयांमध्ये पहिल्या प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांला पाच हजार रुपयांचे बक्षीसही देण्याचे घोषित केले.

तसेच कार्यक्रमांमध्ये अग्र शक्ती बहु मंडळ यांच्या वतीने दहावीच्या ७३ विद्यार्थ्यांना परीक्षा पॅड,पेन टोपी व पेढा भरून परीक्षेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी रितू अग्रवाल श्वेता अग्रवाल शाळेचे मुख्याध्यापक कणखर सर,भानुदास दोबाले, डॉ. दिनेश जोशी अमर शिंदे, दीक्षा कोळे व सचिन कोळे उपस्थित होते.

## राष्ट्रीय बंजारा विकास मिशन भारत संघटनेच्या राज्य मीडिया प्रमुखपदी अरूण राठोड यांची निवड

**मंठा । प्रतिनिधी -** तालुक्यातील तळणी येथील अरूण राठोड यांची राष्ट्रीय बंजरा विकास मिशन भारत संघटनेच्या राज्य मीडिया प्रमुखपदी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष देवराव राठोड यांनी निवड केली. आयोजित कार्यक्रमात नियुक्ती पत्र देऊन सन्मानित केले. यावेळी राष्ट्रीय उपाध्यक्ष बळीराम राठोड, महाराष्ट्र प्रदेशध्यक्ष दतू जाधव, महिला प्रदेशाध्यक्ष सो. सविता चव्हाण,कार्यकारी अध्यक्ष अमोल चव्हाण, प्रदेश उपाध्यक्ष गुलबदास चव्हाण, मराठवाडा महासचिव वैजिनाथ जाधव यांचीही उपस्थिती होती.



अरूण राठोड यांच्या निवडीमुळे बंजारा समाज देशात २६ उप नावाने विभागलेला असून देशात बजारा समाजाला अलग अलग नावाने अलग अलग कॅटेगरीत असल्याने बंजारा समाजाचा विकास झालेला नाही. म्हणून राष्ट्रीय बंजारा विकास मिशन २०१४ पासून श्री देवराव राठोड बंजारा यांचे नेतृत्वात भारत सरकारशी संघर्ष करीत आहेत.

महाराष्ट्र राज्यात आदिवासी आरक्षण श्रेणीत समावेशासाठी महाराष्ट्र राज्यात संघटना मजबूत करण्यासाठी आपल्याला राज्य मिडीया प्रमुख या पदावर नियुक्त केले जात आहे.

आपण आपल्याला जिल्ह्यात, राज्यात तांडा-तांड्यात संघटना मजबुत करावी, संघटनेने दिलेल्या जबाबदारीस आपण विश्वासास पात्र आहातच यात काही शंका नाही, आपणास दिलेल्या जबाबदारीस आपण खंबीर पणे लढा देऊन आपण समाजाला न्याय हक्का मोठा लढा द्यालच असेही नियुक्ती पत्रात नमूद केले आहे. या निवडीबद्दल पत्रकार अरूण राठोड यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## अशोक (लक्ष्मीकांत) पांगारकर भाजपातून निष्काशीतच

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्याच्या पालकमंत्री पहिल्यांदाच जालन्यात आल्या असता अशोक (लक्ष्मीकांत) पांगारकर यांनी बॅनर लावत त्यावर भाजपाच्या नावाचा व चिन्हाचा उल्लेख केला होता. यावर भारतीय जनता पक्षाकडून खुलासा करण्यात आला असून अशोक पांगारकर हे भाजपातून निष्काशितच असल्याचे कळविण्यात आले आहे. प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, भारतीय जनता पार्टी ने दि. ०५/११/२०२४ रोजी बंडखोरी करुन अपक्ष उमेदवारी दाखल केले होते. त्यामुळे बंडखोरी करणाऱ्या उमेदवारांना पत्र काढुन निष्काशीत केलेले आहे. ज्यामध्ये जालना -१०१ विधानसभा निवडणुकीत बंडखोरी करुन उमेदवार म्हणुन निवडणुक लढवित असल्यामुळे भारतीय जनता पार्टीचे माजी महानगर अध्यक्ष अशोक (लक्ष्मीकांत) मनोहरराव पांगारकर यांना देखील भारतीय जनता पार्टी तर्फे निष्काशीत केलेले असतांना ही त्यांनी दि.२६/०१/२०२५ रोजीच्या जालना जिल्हयाच्या पालकमंत्री साहेबा यांच्या दौ-या निमीत्त जालना शहरात भारतीय जनता पार्टीचे नांव व चिन्ह वापरुन शुभेच्छा फलक लावले होते. ज्यामुळे नागरीकांमध्ये ते पुन्हा भाजपा परतले की काय असा समंभ्र निर्माण झाला. आजपर्यंत निष्काशीत पदाधिकाऱ्यांना भाजपात घेण्याबाबत निर्णय झाला नसल्याचे स्पष्ट करत निष्काशीत पदाधिकारी अशोक पांगारकर व भारतीय जनता पार्टी यांचा कोणताही संबध नसल्याचे स्पष्ट करत कुणीही गैरसमज निर्माण करू नये असे म्हटले आहे.

# एकतेतून प्रगती, प्रजासत्ताकाची खरी शक्ती!

**जालना -** प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून मंठा येथील अशोक भाऊ चव्हाण बहुउद्देशीय सेवा संस्था संचलित अशोका पब्लिक स्कूलमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळीच विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी एकत्र येऊन शाळेच्या प्रांगणात तिरंगा फडकवला. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण होऊन राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, भाषणं, नृत्य आणि नाटिका सादर केल्या. विशेषतः काही विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भगतसिंह यांच्यासारख्या महापुरुषांची भूमिका साकारली.

यावेळी प्रमुख पाहुणे एन. टी. सरोदे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अशोक भाऊ चव्हाण सेवा संस्थेचे अध्यक्ष सुधाकर चव्हाण यांनी ध्वजारोहण केले. प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व स्पष्ट करत संविधानाच्या मूल्यांवर भाष्य केले. शिक्षकांनीही आपल्या अनुभवातून विद्यार्थ्यांना देशासाठी जबाबदारीची जाणीव करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वंदना मोरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील शिक्षक वृंद प्रियांका चिंचने, प्राजक्ता कुलकर्णी, राधिका जोशी, आरती कुलकर्णी, कांचन एखांडे, अनंत निर्वळ, स्वाती हिवाळे, धनश्री कापडे, सविता राठोड, प्रणिता दळवी, ज्योती शहाणे आदींनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचा समारोप अल्का चव्हाण यांच्या हस्ते मिठाई वाटपाने झाला. हा दिवस सर्वांसाठी प्रेरणादायी व आनंददायी ठरला.



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# एक राज्य, एक गणवेश निर्णययासह पुस्तकांना वह्यांची पाने लावण्याचा निर्णय रद्द

**मुंबई -** राज्याचे शिक्षणमंत्री म्हणून शिवसेना नेते दीपक केसरकर यांनी पदभार स्वीकारल्यानंतर काही महत्त्वाचे निर्णय घेतले होते. त्यामध्ये, एक राज्य एक गणवेश आणि पुस्तकांना वह्यांची पाने लावण्याचा निर्णयही घेण्यात आला होता. शालेय शिक्षणात राज्य सरकारच्या या निर्णयाची चांगलीच चर्चा रंगली. मात्र, आता दीपक केसरकर यांचे मंत्रीपद गेल्यानंतर आणि राज्यात महायुतीचं नवं सरकार स्थापन झाल्यानंतर राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने तो निर्णय रद्द केला आहे. पुस्तकाला वह्यांची पानं लावण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने वर्षभरातच घेतला मागे घेण्यात आला आहे. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता दुसरी ते आठवी या वर्गासाठी असलेल्या पाठ्यपुस्तकांना वह्यांची पाने लावण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला होता. मात्र, यंदाच्या वर्षापासून तो निर्णय मागे घेण्यात आल्याने आता विद्यार्थ्यांना वह्याच्या पानांशिवाय पुस्तके मिळणार आहेत

शिवसेना नेते दीपक केसरकर हे मंत्री असताना राज्य सरकारने पुस्तकांना वह्याची पानं लावण्याचा निर्णय घेतला होता. विद्यार्थ्यांच्या दफ्तराचं ओझं कमी करण्याचा आणि पुस्तकातच महत्त्वाच्या नोंदी लिहिण्याचा उद्देश ठेऊन हा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, वर्षभरातच हा निर्णय मागे घेण्याची वेळ शालेय शिक्षण



विभागावर आली आहे. सदर योजनेचा शालेय शिक्षण विभागाकडून आढावा घेतला असता, पाठ्यपुस्तकांमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या वह्यांच्या कोऱ्या पानांचा विद्यार्थ्यांकडून शिकविलेल्या घटकांच्या नोंदी घेण्यासाठी अपेक्षेप्रमाणे उपयोग झाल्याचे दिसून आले नाही. तसेच सदर योजनेचा उद्देश हा दप्तराचे ओझे कमी करणे असा होता, परंतु विद्यार्थी पुस्तके व सोबत वह्या देखील घेऊन येत असल्याचे तसेच पाठ्यपुस्तकांमधील कोऱ्या पानांचा शैक्षणिक नोंदी घेण्याकरिता वापर होत नसल्याचे आढळून आले आहे. एकंदरीत, शालेय शिक्षण विभागाला सदर योजनेचा अपेक्षित उद्देश फारशा प्रमाणात सफल झाल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे, हा निर्णय मागे घेण्यात आला असून पूर्वीप्रमाणे पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना वितरित केली जातील, असेही नव्या आदेशात म्हटले आहे. दरम्यान, काही महिन्यांपूर्वी राज्य सरकारच्या'एक राज्य एक गणवेश' योजनेतही बदल करण्यात आले आहेत. एक राज्य एक गणवेश ही योजना सुसूत्रतेअभावी योजना फसल्याचे सांगत या योजनेतही बदल करण्यात आले असून मोफत गणवेश योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी पूर्वीप्रमाणेच शाळा व्यवस्थापन समितीकडे देण्यात येणार आहे. त्यामुळे, थेट लाभार्थी योजनेअंतर्गत शाळा समितीकडे निधी दिला जाणार असून विद्यार्थ्यांना शैक्षणिक सत्र सुरू होताच योग्य मापाचे गणवेश मिळणार आहेत. विशेष म्हणजे हाही निर्णय दीपक केसरकर हे शिक्षणमंत्री असताना घेण्यात आला होता. मात्र, हे दोन्ही निर्णय यंदाच्या वर्षापासून बदलण्यात आले आहेत.

# रेड स्वस्तिक सोसायटीतर्फे डॉ. धिरज छाबडा यांचा सन्मान



**जालना । प्रतिनिधी -** आरोग्य सेवेत २४ वर्षापासून कार्यरत रेड स्वस्तिक सोसायटीच्या २४ व्या वर्धापनदिनानिमित्त व सोसायटीच्या वतीने राबविण्यात आलेल्या आरोग्य सेवेत गरजवंतांना आरोग्य सेवा दिल्याबद्दल जालना येथील मधुमेह तज्ञ डॉ. धिरज शांतीलाल छाबडा यांचा विशेष सन्मान करण्यात आला. १२ जानेवारी रोजी नागपुरातील अर्जुना सेलेब्रीशन सभागृह व्यंकटेशनगर खमला नागपुर येथे राष्ट्रीय स्तरावर वर्धापनदिनाचा शानदार कार्यक्रम पार पडला.

डॉ. छाबडा यांना आयकर विभागाचे सहाय्यक आयुक्त संजय अग्रवाल, बँक ऑफ इंडीयाचे झोनल मॅनेजर जय नारायण, रेड स्वस्तिक सोसायटीचे संस्थापक टी.एस. भाल, राष्ट्र अध्यक्ष सुरेश कोते, राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रमोद चौगुले, विपीन भाईे पटेल यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला.

यावेळी जालना येथील डॉ. आरती मंत्री, जितेंद्र यांचाही सन्मान करण्यात आला. यावेळी कार्यकारी अध्यक्ष भगवान राऊत, महाराष्ट्र अध्यक्ष हेमंत गोरे, सचिव अशोक शिंदे यांच्यासह सचिव डॉ. मोहन शिंदे, डॉ. दिपक मंत्री, जालना येथील रेड स्वस्तिक सोसायटीचे पदाधिकारी शकील खान, रितेश अग्रवाल यांची उपस्थिती होती. रेड स्वस्तिक सोसायटीने गेल्या २४ वर्षापासून ९५ लक्ष गरजवंतांना आरोग्य सेवा मिळवून दिली आहे. डॉ. धिरज छाबडा यांचा सन्मान झाल्याबद्दल त्यांचे डॉ. रेखा छाबडा, डॉ. सौ. तरूणा छाबडा, रजत चौविश्या, रूपेश चौविश्या व मित्र परिवाराने अभिनंदन केले आहे.

# घरगुती गॅस वाहनात भरून अवैध विक्री करीत असताना पोलिसांनी मारला छापा



**परतूर । प्रतिनिधी -** परतूरात दि. २६/०१/२५ रोजी परतूर पोलिसांना माहिती मिळाली की, स्टेडियम येथे खाजगी वापराचा गॅस लाल सिलेंडर मधून प्रेशर मशीन चे मदतीने वाहनात एल पी जी गॅस भरताना मिळून आल्याने अचानक छापा मारून पकडले असता त्या ठिकाणी ५ ऑटो रिक्षा, ६ लाल एल पी जी गॅस सिलेंडर, प्रेशर मशीन, मोटार, वजन काटा असा ५,२३,४००/- चा मुद्देमाल जप्त करून आरोपी आली हसन मोहमदी, ऑटो चालक अहमद हबीब शेख, सय्यद महबूब सय्यद चांद, सुनील विठ्ठलराव मोहिते, सय्यद सलीम समद यांच्यावार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरची कारवाई ही मा. अजय कुमार बंसल, पोलिस अधीक्षक जालना, मा.आयुष नोपाणी, अप्पर पोलिस अधीक्षक जालना, मा. दादहरी चौरे,उप विभागीय पोलिस अधिकारी, परतूर यांच्या मार्गदर्शनाखाली एम.टी.सुरवसे, पोलिस निरीक्षक, पोलिस स्टेशन परतूर. विठ्ठल केंद्रे, पो उप निरिक्षक पोहेकॉ / अशोक गाढवे, पोकॉ/ शामुल गायकवाड, पोकॉ/ ज्ञानेशोर वाघ, ३२पोकॉ/ सतीश जाधव, चालक/ पोकॉ स्वप्नील फंड यांनी केली आहे.

# संतराम आखाडे यांचे निधन

**परतूर । प्रतिनिधी -** आंबेडकर चळवळीतील जेष्ठ नेते,सामाजिक कार्यकर्ते पत्रकार संतराम आखाडे यांचे मंगळवारी दि. २८, सकाळी निधन झाले. ते ५५ वर्षांचे होते.



मागील काही दिवसांपासून ते आजारी होते. त्यांच्यावर प्रारंभी जालना व त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात उपचार करण्यात येत होते. मात्र मंगळवारी सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली.त्यांच्या पार्थिवावर वैकुंठधाम स्मशाभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी समाजातील सर्व स्तरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यांच्या पश्चात आई,पत्नी, दोन मुले,तीन मुली,सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार अर्जुन पाडेवार यांचे ते मामा होत.







# छत्रपती संभाजी महाराज चौक, विडोली रोडवरील अतिक्रमणधारकांवर मंठा नगरपंचायतचा हातोडा

**मंठा । प्रतिनिधी -** शहरांमध्ये गेल्या काही दिवसापासून दिवसेंदिवस अतिक्रम णामध्ये मोठी वाढ होत आहे. मंठा शहरातील मुख्य रस्त्यासह ठिकठिकाणी अतिक्रमण धारकांसह हातगाड्यांनी रस्ते व्यापले असल्यामुळे रहदारीस मोठा अडथळा निर्माण होत आहे. यामुळे मंठा शहरातील अतिक्रमण हटविण्यात यावे अशी मागणी निवेदनाद्वारे सार्वजनिक बांधकाम उपविभाग व नगर पंचायत कार्यालयात करण्यात आली होती.

मंठा शहरातील विडोळी रस्त्यावर अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण केल्याने रस्ते अरुंद झाले होते अतिक्रमण धारकांनी टपरीधारक व बांबु चा गराडा टाकला होता

दोन्ही मार्गावर अतिक्रमण केल्याने बसगाडीला येजा करतांना देखील मोठा अडथळा निर्माण होत होता. यासह परिसरामध्ये रहदारीला देखील मोठा अडथळा निर्माण होत होता परिसरामध्ये वारंवार वाहतूक कोंडी होत आसे. त्याचबरोबर व विडोळी फाटा गेवराई,विडोळी, मंगरूळ या रोडवरील अतिक्रमण मोठ्या प्रमाणात वाढलेले होते. विडोळी फाटा येथे दारूचे दुकान मटणाचे दुकान अतिक्रमणधारक थाटून बसलेले होते या रोडवर ग्रामीण भागातील विद्यार्थी महिला दारुड्यामुळे त्रास सहन करावा लागत होता मंठा नगरपंचायत सार्वजनिक बांधकाम विभाग आंबोडा गेवराई विडोळी या गावातील ग्रामस्थांनी निवेदन दिले होते याची दखल घेत मंठा नगरपंचायत चे सिओ यांच्या मार्गदर्शनाखाली आज अतिक्रमण हटवण्यात आले यावेळी मंठा नगरपंचायत चे इंजिनियर अविनाश चव्हाण रामेश्वर बोराडे सरकटे साहेब रमेश खंदारे आकाश मोरे संजय खनपडे सुलाबाई थोरात शुभम अंभोरे विकास कौतकर मोहन वाघमारे अजित चव्हाण आकाश पाखरे लहू पवार सुरेश शिंदे या नगरपंचायतच्या कर्मचाऱ्यांनी अतिक्रमण सहभाग होता.





# पर्यावरण संरक्षण हा आजच्या काळातील सर्वांत महत्त्वाचा विषय- न्या. वर्षा मोहिते



**जालना । प्रतिनिधी -** पर्यावरण संरक्षण हा आजच्या काळातील सर्वांत महत्त्वाचा विषय असून,इनरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनने पर्यावरणपूरक प्रजासत्ताक दिन उपक्रम उपक्रमातून पर्यावरण जपण्याचा संदेश दिला असून, तो प्रत्येक व्यक्तीने गंभीरपणे स्वीकारला पाहिजे. या आगळ्या उपक्रमाने प्रजासत्ताक दिनाचा आनंद द्विगुणित केला आहे, असे गौरवोद्गार प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्षा मोहिते यांनी येथे बोलताना काढले. इनरव्हील क्लब ऑफ जालना होरायझन आणि हिरवा अंकुर या संस्थेने प्रजासत्ताक दिनानिमित्त अनोख्या पद्धतीने पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. जिल्हा न्यायालयाच्या प्रवेशद्वारासमोर रांगोळीतून भारताचा नकाशा साकारून, त्याभोवती ठेवलेल्या रोपांच्या कुंड्या न्यायाधीश, वकील मंडळींना प्रजासत्ताक दिनानिमित्त भेट देऊन, त्यांनी या रोपांचा सांभाळ करावा आणि ५ जून या पर्यावरणदिनी न्यायालय परिसर, निवासस्थान अथवा पारसी टेकडीवर त्याचे रोपण करावे, अशी ही संकल्पना होती. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून न्या. मोहिते बोलत होत्या. यावेळी सर्व न्यायाधीशांची प्रमुख उपस्थिती होती. न्या. मोहिते यांनी या उपक्रमाचे कौतुक करत उपस्थितांना पर्यावरण संवर्धनाचे म हत्त्व पटवून देत, या उपक्रमाने प्रजासत्ताक दिनाला वृक्षारोपण व वृक्ष संवर्धनाची किनार लाभल्याचे त्या म्हणाल्या. क्लबच्या अध्यक्षा ॲड. अश्विनी धन्नावत यांनी पर्यावरण संवर्धनाची आवश्यकता आणि त्यासाठी प्रत्येकाच्या योगदानाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, आपल्या पुढच्या पिढ्यांना निरोगी आणि हरित पर्यावरण देणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. रोपांचे संवर्धन म्हणजे केवळ झाडे लावणे नाही तर त्यांची काळजी घेऊन त्यांना वाढवणे हा त्यामागील खरा उद्देश आहे. या उपक्रमामुळे समाजात पर्यावरणाविषयी जागरूकता नि ींळपेवलेवश्रशसारळश्र.ले र्माण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या शेवटी भारताचा नकाशाभोवती ठेवलेल्या रोपांच्या कुंड्या न्यायाधीश, वकील व कर्मचाऱ्यांना देऊन त्यांचे संवर्धन करण्याचे आवाहन करण्यात आले. उभयतांनी ५ जून या पर्यावरणदिनी या रोपांचे वृक्षारोपण न्यायालय, निवासस्थान किंवा पारसी टेकडी येथे करण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाला न्यायालयातील न्यायाधीश, वकील, कर्मचारी, क्लबच्या सचिव ॲड. पिंकी लड्डा, पुनम खंडेलवाल, पुनम अग्रवाल, पायल अग्रवाल आणि आणि सदस्यांची उपस्थिती होती.

